महासागर अमरावती

शनिवार दि. 21 सप्टेंबर 2024



# मित्रा टेक्सटाईल पार्क औद्योगिक क्रांतीचे पाऊल

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

### प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्कचे ई-भूमिपूजन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 20) -** अमरावती येथील पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्कमुळे देशाच्या अर्थकारणाला हातभार लागणार आहे. याठिकाणी तीन लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. टेक्सटाईल पार्कमुळे याठिकाणी आमुलाग्र बदल होणार आहेत. या भागाच्या औद्योगिक क्रांतीसाठी हे क्रांतीकारी पाऊल आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केले. त्यांच्या हस्ते वर्धा येथून नांदगाव पेठ येथील पीएम मित्रा पार्कचे ई-भूमिपूजन करण्यात आले.

नांदगाव पेठ येथील अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्र येथे वर्धा येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. खासदार डॉ. अनिल बोंडे, नवनीत राणा, आमदार रवी राणा, डिगर गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रज्ञा बाजारे, पिंपर विहीरच्या सरपंच मुक्ता ठाकरे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता ए. बी. डाबेराव, सहायक पोलिस आयुक्त सागर पाटील, के. एम. पुंडकर, प्रादेशिक अधिकारी प्रशांत पडाळकर, वस्त्रोद्योग उप वस्त्रोद्योग अभियंता सुधीर अमृतकर, तहसीलदार वैशाली पाथरे, उप अभियंता संजय विधळे, उप अभियंता राठोड, क्षेत्र व्यवस्थापक सुभाष राऊत आदी उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्क ही वस्त्रोद्योग क्षेत्रात क्रांती आणणारी योजना आहे. पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क येथे जागतिक दर्जाच्या औद्योगिक पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील.

यामुळे थेट शेतातून विदेशात निर्यात होणारे कापड निर्मितीकरीता संपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतील. नांदगाव पेठ येथील अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात 1 हजार हेक्टर जागेमध्ये पीएम मित्रा पार्क उभारण्यात येणार आहे. येथे 10 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. निर्यात क्षमता वाढीसाठी फाईव्ह एफ व्हिजन ठेवण्यात आले आहे. यामध्ये फार्म ते फायबर, फायबर ते फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन ते फॉरेन अशा पद्धतीने कार्यप्रणाली राबविण्यात येणार आहे. पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कमुळे अमरावतीचे नाव देशाच्या नकाशावर अधोरेखित होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टेक्सटाईल पार्कमुळे औद्योगिक वसाहतीचा चेहरामोहरा बदलला आहे. याठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येण्यास मदत झाली आहे. याठिकाणी तीन लाख रोजगार निर्माण होणार असल्याने या भागाची प्रतिमा उंचावण्यास मदत होणार आहे. देशातील सात टेक्सटाईल पार्कपैकी एक विदर्भात मंजूर झाल्याबद्दल प्रधानमंत्र्यांचे आभार मानले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी टेक्सटाईल पार्क अमरावती येथे दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. यामुळे देशाचा जीडीपी वाढविण्यासाठी राज्याच्या वाटा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. स्थानिकांना येथे अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येथील अर्थकारणास वेग येणार आहे. याठिकाणी नविन गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी टेक्सटाईल पार्क मंजूर होणे ही महत्वपूर्ण बाब आहे. त्यामुळे विकासाच्या वाटा निर्माण होतील. टेक्सटाईल पार्कचे भूमिपूजन होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

#### अमरावती महाराष्ट्रासाठी औद्योगिक केंद्र बनेल

महाराष्ट्र हे उच्च दर्जाच्या कापसाचे केंद्र आहे. मात्र, काँग्रेससह त्यांच्या मित्रांनी महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेच 2014 मध्ये देवेंद्र फडणवीस यांचे सरकार राज्यात आले. त्यांनी अमरावतीतील नांदगावात टेक्स्टाईल पार्क उभारण्याचा निर्णय घेतला. फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकार येण्यापूर्वी या ठिकाणी उद्योग येण्यास तयार नव्हते. मात्र, आता अमरावतीचे हे क्षेत्र महाराष्ट्रातील औद्योगिक केंद्र बनत आहे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

# खा. बळवंत वानखडे, आ. यशोमती ठाकूरसह 40 जणांवर गुन्हे दाखल

### जमावबंदीचे उल्लंघन व विना परवानगी आंदोलन केल्याचा आरोप



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 20)** राहूल गांधी विरोधात बेताल वक्तत्व केल्यानंतर खा. बळवंत वानखडे, आमदार यशोमती ठाकूर यांनी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सीपी रेड्डींच्या दालनात ठिय्या दिला होता. याबाबत बळवंत वानखडे, यशोमती ठाकूरसह काँग्रेसच्या 40 पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

राहुल गांधीची जिभ छाटण्याची भाषा योग्य नाही. पण, त्यांनी संविधानाविरोधात केलेल्या चुकीच्या भाष्याबद्दल त्यांच्या जिभेला चटके द्यायला हवे, असे खा. बोंडेंनी ऑनकॅमेरा उद्गार काढल्याने आधी यशोमती ठाकूर विरूध्द अनिल बोंडे असा सामना रंगला होता. त्यानंतर हा वाद भाजप विरूध्द काँग्रेस असा झाला. बोंडे वारंवार दंगा भडकविण्याच्या उद्देश्याने भाष्य करतात. तरी देखील पोलिस त्यांच्यावर सुमोटे ?क्शन घेत नाही, असा रोष व्यक्त करून आ. यशोमती ठाकूर ह्या 18 सप्टेंबर रोजी खा. बळवंत वानखडे, माजी आमदार सुनील देशमुख, प्रा. विरेंन्द्र जगताप, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहर अध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, अनिकेत देशमुख, हरीभाऊ मोहोड, प्रवीण मनोहरे, नितिन गोंडाणे, हेमंत चिमोटे, रवींद्र शिंदे, सागर कलाने, आकाश खडसे, सागर व्यास, संजय मोरे, संजय आठवले, निलेश गुहे यांच्यासह आदि अनेकांसह सीपींच्या दालनात प्रवेश केला. तसेच बोंडेंवर गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. जोपर्यंत बोंडेंना अटक होत नाही; तो पर्यंत दालनातून हटणार नाही, असा पवित्रा यशोमतींनी घेतल्यानंतर सीपींच्या दालनात चांगलेच वातावरण तापले होते. पोलिसांनी बोंडेंवर गुन्हे दाखल केल्यानंतर काँग्रेसने सीपींच्या दालनातील ठिय्या मागे घेतला. त्यानंतर शहर पोलिसांनी फिर्याद देऊन खा. बळवंत वानखडे, आ. यशोमती ठाकूरसह वरील नमूद काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांविरोधात जमावबंदीचे उल्लघंन व विना परवानगीने आंदोलन केल्याचे फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## राज्यस्तरीय विद्यार्थी मेळावा आज

**अमरावती-** राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद, कोलकत्ता व नॅशनल कौन्सिल ऑफ सायंस म्युझियम यांच्यातर्फे अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी, दि. 21 रोजी सकाळी 9 वाजता शिवाजी विज्ञान महाविद्यालयात या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे.

# एसडीओ यांच्या दालनात शेतकऱ्यांने केले विष प्राशन

### धरणात गेलेल्या शेतीचा मोबदला मिळविण्यासाठी झाले होते त्रस्त

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि. 20)** धरणात गेलेली शेतीचा मोबदला न मिळाल्याने एका शेतकऱ्याने चांदुर रेल्वे उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन विष प्राशन केले आणि आपले जीवन संपवण्याचे प्रयत्न केला. सुदैवाने शेतकर्याला तत्काळ जिल्हा ग्रामीण रुग्णालय येथे पाठवण्यात आले.



मिळालेल्या माहितीनुसार 2021 पासून गाव सालोड तालुका नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती येथील शेतकरी दिलीप तुळशीराम ढगे व इतर यांच्या मालकीचे सालोड तालुका नांदगाव जिल्हा अमरावती येथील गट नंबर 137 क्षेत्रफळ 6 हेक्टर 74 जमीन चांदी नदी प्रकल्प अंतर्गत संपादित करण्यात आली होती, सदर भूसंपादित शेत अंतिम निवाडा रामकृष्ण तुकाराम ढगे व इतर यांच्या नावे झालेला असून त्यांनी संपादित शेत जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे अर्ज सादर केला होता.

परंतु सदर प्रकरणात आपसी विवादा मुळे संबंधित भूधारकांना मोबदला रक्कम देण्यात आली नाही. त्या अनुषंगाने भूसंपादन मोबदला रक्कम मिळण्याकरिता रामकृष्ण ढगे व इतर यांनी विंनंती केली होती. त्यानंतर शेत जमिनीचे भूसंपादन रक्कम अदा करण्याकरिता शेतकऱ्याना 16 ऑगस्ट रोजी कार्यालयात बोलवण्यात आले होते. यावेळी कुटुंबातील सर्व सदस्य कार्यालयात आले असता या वेळी सुनावणी करण्यात आली नाही, या अगोदर व नंतर सुद्धा सदर शेतकर्यांचे कुटुंबीयांना कार्यालयात बोलून सुद्धा सूनवणी करण्यात आली नाही, त्यामुळे 20 सप्टेंबर रोजी अखेर दिलीप तुळशीराम ढगे नामक शेतकर्याने मोबदला रक्कम मिळविण्याकरिता कार्यालयात विष प्राशन करून स्वत:चे जीवन संपवण्याचा प्रयत्न केला, सदर शेतकर्याची तब्येत चिंताजनक असल्याकारणाने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय येथे भरती करण्यात आले, पुढील कारवाई चांदुर रेल्वे पोलीस करत आहे.

# मोकाट श्वानांनी गोठ्यामधील शेळ्यांची 11 पिल्ले केली फस्त

### मोझरीतील घटना नागरिकांत कुत्र्यांची दहशत

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, (दि. 20)** गुरुकुंज मोझरी गुरुकुंज मोझरी परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट श्वानांचा वावर वाढत असून, या श्वानांनी एका शेतकर्याच्या गोठ्यातील शेळीच्या पिल्लांना लक्ष्य करत त्यांच्यावर हल्ला केला. या श्वानांनी एकूण 11 पिल्लांचा फडशा पाडला. ही घटना बुधवारी (ता. 18) दुपारी 2 वाजताच्या सुमारास घडली आहे.



या घटनेत पशुपालक मारोतराव राऊत यांचे जवळपास 50 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. मोझरी येथील मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे मारोतराव राऊत यांचा घरालगतच काही अंतरावर शेळ्यांचा गोठा आहे.

नेहमीप्रमाणे बुधवारी ते शेळ्या शेतात चराई करण्यासाठी घेऊन गेले होते. त्या वेळी त्यांनी गोठ्यात शेळीची पिल्ले बांधून ठेवली होती. दुपारच्या सुमारास परिसरात अथवा गोठ्यात कुणीच नसल्याची संधी साधून गावातील भटक्या व मोकाट श्वानांनी या शेळीच्या पिल्लावर हल्ला चढवत एकूण 11 पिल्ल्यांना फस्त केले. दरम्यान मारोतराव राऊत हे सायंकाळच्या सुमारास गोठ्यात गेले असता त्यांना शेळ्यांची पिल्ले मृतावस्थेत दिसली. घटनेची माहिती मिळताच मोझरी येथील सरपंच सुरेंद्र भिवगडे, उपसरपंच प्रशांत प्रधान, जसबीर ठाकूर यांनी घटनास्थळी भेट दिली. यासंदर्भात दूरध्वनीवरून पशू वैद्यकीय अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकार्यांना घटनेची माहिती देण्यात आली. दरम्यान या घटनेने मोझरी येथील परिसरात मोकाट श्वानांची मोठी दहशत पसरली असून ग्रामस्थांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

#### मोकाट श्वानांचा बंदोबस्त करा

मोझरी येथील परिसरात सर्वत्र भटक्या व मोकाट श्वानांनी चांगलाच उच्छाद मांडला असून, त्यांची दहशत निर्माण झाली आहे. त्यामुळे गावातील मोकाट व भटक्या श्वानांचा बंदोबस्त करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

# 'वंचित' आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये राडा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 20)** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या आरक्षणासंदर्भात केलेल्या वक्तव्यावरून भाजपतर्फे ठिकठिकाणी आंदोलन केले जात आहे. अशातच आता वंचित बहुजन आघाडीने राहुल गांधी यांच्या विरोधात मोहीम छेडली आहे. शुक्रवारी राहुल गांधी यांच्या व्यक्तव्याचा वंचित बहुजन आघाडीने निषेध करून, काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांच्या दर्यापूर येथील निवासस्थानासमोर आंदोलन केले.



त्यामुळे प्रचंड गोंधळ उडाला. यावेळी प्रचंड घोषणाबाजी करण्यात आल्यामुळे खासदार बळवंत वानखडे यांच्या समर्थकांनीही प्रत्युत्तर देत घोषणा दिल्याने खळबळ उडाली होती.

वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेसचे कार्यकर्ते एकमेकांच्या अंगावर धावून गेले होते. परंतू तेथे उपस्थित पोलिसांनी वेळीच कार्यकर्त्यांना रोखले आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष धैर्यवर्धन पुंडकर यांच्या नेतृत्वात खासदार बळवंत वानखडे यांच्या दर्यापूर येथील निवासस्थानावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपासून हा निषेध मोर्चा काढण्यात आला होता.

# विधानसभा निवडणुकीकरिता जिल्हा प्रशासनाची जोरात तयारी

### जिल्ह्यात 2 हजार 682 मतदान केंद्रे ■ 24 लाख 54 हजार 848 मतदार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 20) -** लोकसभेनंतर आता जिल्हावासियांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागले असून, या निवडणुकीसाठी राजकीय तथा प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. अमरावती जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांच्या निवडणुकीची आचारसंहिता कधी व केव्हा लागणार, याचीच चर्चा आता रंगु लागली आहे. अमरावती जिल्ह्यातील आठ मतदार संघाच्या निवडणुकीसाठी निवडणुक विभागाकडून 3 हजार 342 मतदान यंत्रे सज्ज करण्यात आली असून, सध्या ही यंत्रे सर्व मतदारसंघाच्या शासकीय गोदामामध्ये सुरक्षित ठेवली आहेत. जिल्ह्यातील 24 लाख 54 हजार 848 मतदारांची नावे अपडेट झाली असून, 2 हजार 682 मतदान केंद्रे लवकरच सज्ज होणार असल्याचे चिन्ह आता दिसून लागली आहे.



विधानसभा आचारसंहिता केव्हाही लागली तरी जिल्हा प्रशासनाने मतदार यादी अंतिम अपडेट करण्यास गती मिळाली आहे. यासह निवडणुकीसाठीची आवश्यक तयारी जोरात सुरू झाली आहे. राज्य सरकारचा कार्यकाळ येत्या 26 नोव्हेंबर रोजी संपणार आहे. राज्यात 15 ऑक्टोबरपूर्वी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने निवडणुकीची तयारी चालविली आहे.

#### मतदान यंत्रावर प्रात्यक्षिक आटोपली

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदार यंत्रे आली असून विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोर यंत्राची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. यामध्ये 1 ते 26 ऑगस्ट दरम्यान मतदान यंत्रणाची प्रथमस्तरीय तपासणी करण्यात आली. 27 व 28 ऑगस्ट रोजी विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीसमोर मतदान यंत्रणावर मतदान यंत्रावर प्रात्यक्षिक घेण्यात आले.

#### निवडणुकीच्या कामे सुरु

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार यादी अपडेट झाली आहे. मतदानाची केंद्रेही निश्चित करण्यात आली. मतदान यंत्रांची पहिल्या स्तरावरील तपासणी करण्यात आली. निवडणुक आयोग कार्यालयातून प्राप्त झालेल्या दिशा-निर्देशानुसार सर्व कामे केली जात आहे.

**शिवाजी शिंदे,**
**निवडणुक अधिकारी**

#### विधानसभानिहाय मतदान केंद्र

| | |
|---|---|
| धामनगावरेल्वे | 378 |
| बडनेरा | 345 |
| अमरावती | 322 |
| तिवसा | 319 |
| दर्यापूर | 342 |
| मेळघाट | 356 |
| अचलपूर | 309 |
| मोर्शी | 311 |
| एकूण | 2682 |


## अमरावती महानगरपालिका, अमरावती

(बांधकाम विभाग-शहर अभियंता)

### अल्पमुदत निविदा सुचना

क्रअमनपा/बां.वि./श.अ/नि.सु.क्र./३४/२४
दि. १८/०९/२०२४

अमरावती महानगरपालिका शहर अभियंता, बांधकाम विभाग मधील विकास शुल्क निधी अतर्गत करावयाच्या कामाचा निविदा प्रसिद्धीचा जा.क्र. ३४/२४/ दि. १८/०९/२०२४ नुसार मनपाच्या बांधकाम विभागातील नोटीस बोर्ड वर सविस्तर निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| अल्पमुदत मॅन्युअल-निविदा प्रसिद्धी | दि. १८/०९/२०२४ |
| कोऱ्या निविदा करीता अर्ज करण्याचा दिनांक | दि. २५/०९/२०२४ |
| निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि. ३०/०९/२०२४ दु. ४.०० वाजेपर्यंत |
| मॅन्युअल निविदा उघडण्याची दिनांक (Technical) | दि. ३०/०९/२०२४ दु. ४.०० वा. (शक्य झाल्यास) |

खालील प्रमाणे अल्पमुदत मॅन्युअल निविदा सुचना कार्यक्रम दिलेला आहे.

अमनपा/जसंवि/११९/२०२४
दिनांक :- २०/०९/२०२४

शहर अभियंता
महानगरपालिका, अमरावती


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# वंचित बहुजन आघाडीचे ‘जवाब दो’ आंदोलन

## आ.ठाकूर यांच्या निवासस्थानी जाताना निलेश विश्वकर्मा यांचेसह कार्यकर्त्यांना अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )-** वंचित बहुजन आघाडी, अमरावती जिल्हाचे वतीने आयोजित ‘जवाब दो’ आंदोलनाचे माध्यमातून काँग्रेस पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षण विरोधी केलेल्या वक्तव्याचा जाहीर जवाब विचारण्यासाठी जात जाताना युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष डॉ. निलेश विश्वकर्मा यांचेसह कार्यकर्त्याना अटक करण्यात आली.




काँग्रेस पक्षनेते राहुल गांधी यांनी वाशिंग्टन येथे एका मुलाखती दरम्यान भारतात विकसित समान परिस्थिती निर्माण झाल्यावर आम्ही आरक्षण संपविण्याचा विचार करू असे विधान केले आहे. या विधानातून राहुल गांधी व काँग्रेस पक्षाची आरक्षण विरोधी मानसिकता स्पष्ट होत आहे. भारत देशात महाराष्ट्र सह इतर राज्यात एससी, एसटी, ओबीसी व इतर सर्व आरक्षणवादी समूह अद्यापही सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक दृष्टीने समान स्तरावर पोहचला नसताना आरक्षण वाद्यांची मते घेऊन आरक्षण संपविण्याची भाषा करणे मागासवर्गीय जनतेच्या हिताच्या विरोधी आहे असा आरोप वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी केला. महाराष्ट्र राज्यातील समस्त आरक्षणवादी जनतेच्या वतीने आम्ही जवाब मागत आहोत की, आरक्षणवादी समूहाने काँग्रेस पक्षाला मते देऊन अनेक मतदारसंघात खासदार निवडून दिलेत, आज त्याच जनतेचे आरक्षण काढून टाकण्याची भाषा आपण का करत आहात..? आरक्षणवादी समूह एससी, एसटी, ओबीसी सह इतर छोट्या जातीतील समूह असून हा वर्ग कधीच श्रीमंत, गर्भश्रीमंत नाही तेव्हा आपण त्यांचे आरक्षण काढून टाकण्याचे बोलणे म्हणजे एस सी, एस टी, ओबीसी वर्गाच्या विकासाच्या विरोधी आपली भूमिका आहे का.? असा सवाल वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम यांनी केला.

सदर आंदोलन वेळी काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव तथा आमदार यशोमती ठाकूर यांच्या निवासस्थानी जवाब विचारण्यासाठी जात असताना वंचित बहुजन आघाडीच्या शेकडो कार्यकर्त्याना गाडगे नगर पोलिसांनी अटक करून स्थानबद्ध केले. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम, महासचिव सिध्दार्थ भोजने, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष प्राजक्ता पिल्लेवान, जिल्हा महासचिव सागर भवते, बाबाराव गायकवाड, बी आर धाकडे, रमेश आठवले, प्रमोद मुंद्रे, राहुल भालेराव, सचिन जोगे, सुरज चव्हाण, शंकर काळे, अमोल जवंजाळ, प्रमोद राऊत, मयुरेश इंगळे, विनोद खाकसे, प्रशांत गजभिये, शैलेश बागडे, विनय बांबोळे, अजय तायडे, हंसराज अधम, रोषण गाडेकर, कपिल नाईक, प्रशांत नाईक, चंदूभाऊ मोहोड, शैलेश काकने, अमोल सरवटकर, दिनेश इंगळे, शालू धाकडे, अस्मिता बागडे, मनिषा बांबोळे, रिना गजभिये, सह शेकडो कार्यकर्ते सहभागी होते.

# कृषी विभागाच्या जाचक अटींमुळे शेतकरी अनुदानापासून वंचित

## गेल्या खरीप हंगामातील ई-पिक पाहणी अटीला बगल

### कृषी विभागाच्या भोंगळ कारभार

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.20 )-** अंजनगाव बारीसह परिसरातील अशा अनेक गावातील शेतकऱ्यांवर कृषी विभागाने अन्याय केला आहे. याकडे संबंधित सर्व अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण करत असुन कृषी विभागाच्या अनुदानासाठीच्या बदलत्या जाचक अटींमुळे शेतकरीवर्ग संभ्रमात पडला आहे.



यासंदर्भात सविस्तर वृत्त असे की, कृषी विभागाकडून खरीप 2023 मधील ई-पिक पाहणी केलेल्या पोर्टलवर नोंद असलेल्या शेतकऱ्यांना कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना 0.2 हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट 1 हजार व 0.2 हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रासाठी त्याच्या क्षेत्रानुसार दोन हेक्टरच्या मर्यादेत 5 हजार रूपये अर्थसहाय्य अनुदान देण्यात येणार आहे. या अनुषंगाने एक यादी गावांमध्ये प्रकाशित करण्यात आली. त्या यादीमध्ये शेतकऱ्यांची नावे व आलेली रक्कम ही दिली असुन शेतकऱ्यांकडून वैयक्तिक व सामूहिक हमीपत्र भरून घेतली परंतु, या यादीमध्ये बऱ्याचशा शेतकऱ्यांची नावे वगळल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष व्यक्त होताच कृषी विभागाने पुन्हा अशा वगळलेल्या शेतकऱ्यांकडून पुन्हा एक नवीन अर्ज भरून घेतला ही एकप्रकारे कृषी विभागांकडून शेतकऱ्यांची दिशाभूल आहे. राज्य शासनही यामध्ये मागे नसुन ऐन विधानसभा निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांमध्ये रोष उफाळून येऊ नये म्हणून शेतकऱ्यांची दिशाभूल करून अनुदानातील जाचक अटी देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करत असुन वेळेवर शेतकऱ्यांमध्ये तारांबळ उडाली असुन शेतकरी संभ्रमावस्थेत पडला आहे.

वेळोवेळी व मुदत संपल्यानंतर बदलणाऱ्या जाचक अटी व शासनाच्या दुप्टी धोरणामुळे शेतकऱ्यांनी कृषी विभागावर प्रश्न चिन्ह उपस्थित केला आहे. 2023-24 मध्ये ई-पिक पाहणी करणाऱ्या महत्वाच्या अटीला बगल देऊन कृषी विभागाने ज्या शेतकऱ्यांची नावे या यादीमध्ये आहे व नावे न आलेल्या शेतकऱ्यांत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असुन याला जबाबदार कोण? यामध्ये शेतकरी चिंतेचे वातावरण निर्माण होऊन शेतकरी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत या कारणांमुळे शेतकरी बहिष्कार टाकण्याची चर्चा शेतकरीवर्गातून चर्चिल्या जात आहे.

# नांदगाव खंडेश्वर आयटीआयच्या प्रशिक्षणार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,( दि.20 )-** औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), नांदगाव खंडेश्वर व नगरपंचायत, नांदगाव खंडेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री खंडेश्वर देवस्थान परिसरात बुधवारी (ता. 18) स्वच्छता मोहीम राबवून आयटीआयच्या प्रशिक्षणार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. सदर उपक्रम आयटीआयचे प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे व नगरपंचायतचे मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांच्या नेतृत्वात पार पडला.

### खंडेश्वर देवस्थान परिसरात साफसफाई

### आयटीआय व नगरपंचायत चा संयुक्त उपक्रम

स्वच्छता ही सेवा 2024 ही मोहीम 14 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या कालावधीत स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता या शीर्षकासह राबवली जात आहे. याच मोहिमेअंतर्गत नांदगाव खंडेश्वर येथील नगरपंचायत व आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमाने श्री खंडेश्वर देवस्थान परिसरात साफसफाई करण्यात आली. याशिवाय नगरपंचायतच्या वतीने सर्व प्रशिक्षणार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. या मोहिमेनंतर देवस्थान परिसर चकाकला होता.

यावेळी प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे, नगरपंचायतचे मुख्याधिकारी निवृत्ती भालकर, पाणीपुरवठा अभियंता अभिजीत लोखंडे, आरोग्य निरिक्षक प्रितम सोनटक्के, शहर समन्वयक नेमिनाथ सानप, कर्मचारी संजय चौधरकर, आशिष दळवी, आयटीआयचे शिल्पनिदेशक प्रफुल्ल कचरे, निलेश देऊळकर, राम इखार, सुशिल सरोदे, सागर डांगे, वैभव केणे, प्रशांत पोच्ची, शहजाद खान, सचिन वाहणे, सचिन दुवधने, समिर भुरे, मयुरी वसुले, रूचिका डोरस, संगिता बिबेकर, दिपाली लोखंडे, कर्मचारी निलेश खंडार, मनोज पकडे, मडावी, रवि लेंडे, संगिता राऊत, सुरक्षारक्षक धिरज तायडे आदींची उपस्थिती होती.

# पीएसआय नंदलाल लिंगोट यांचा पोलीस अधिक्षकांनी केला गौरव

## एका गुन्ह्यात उत्कृष्ट अन्वेषण केल्यामुळे सन्मान

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.20 ) -** एका गुन्ह्यात उत्कृष्ट अन्वेषण केल्यामुळे चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनचे पीएसआय नंदलाल लिंगोट यांचा अमरावती ग्रामिणचे पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

चांदूर रेल्वे शहरातील विरूळ चौक येथील 9 ऑक्टोबर 2023 च्या मारहाण प्रकरणातील आरोपीला 3 वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चांदूर रेल्वे यांनी नुकतीच सुनावली आहे. गुन्ह्याचे तपास अधिकारी पोलीस उपनिरिक्षक नंदलाल लिंगोट यांनी जखमी यांचे जखमेबाबत वैद्यकीय अहवाल प्राप्त करुन सदर गुन्ह्यात कलम 326 भा.दं.वी. वाढ केली, तसेच साक्षीदार यांचे बयान नोंदवून विहीत मुदतीत गुन्ह्याचा तपास पूर्ण केला व दोषारोप प्रथम वर्ग न्यायालय, चांदूर रेल्वे येथे दाखल केले होते. सदर प्रकरण साक्ष पुराव्यावर आल्याने तपास



अधिकारी पीएसआय नंदलाल लिंगोट यांनी ठाणेदार अजय आकरे यांच्या मार्गदर्शनात केस मधील साक्ष पुरावे न्यायालयात हजर करण्याकरीता पाठपुरावा केला. त्यामुळे दोषसिध्दी होऊन आरोपीला शिक्षा झाली. सदर प्रकरणात उत्कृष्ट अन्वेषण करून गुन्ह्यातील आरोपीस शिक्षा होण्यास मदत केल्याची उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे नंदलाल लिंगोट यांचा प्रशस्तीपत्र देऊन ग्रामीण पोलीस अधिक्षकांनी सन्मान केला आहे.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री योजनाच्या शिबिराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.20 )-** वयोश्री योजना (केंद्रस्तर )अंतर्गत पंचायत समिती अंजनगाव सुर्जी येथे दि.15 सप्टेंबर रोजी साठ वर्षे वरील जेष्ठ नागरिकांसाठी भव्य शिबिराचे यशस्वी आयोजन अंजनगाव सुर्जी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाद्वारे आयोजन करण्यात आले होते. जवळपास या शिबिरामध्ये 200 ज्येष्ठ नागरिकांना लाभ मिळाला. यावेळी समाज कल्याण विभाग अमरावती येथील संपूर्ण टीम ने शिबिराला मार्गदर्शन केले. तसेच सहाय्यक गटविकास अधिकारी जायभाय व गटशिक्षणाधिकारी बी.आर.गिरासे यांनी कार्यक्रमाचे



उदघाटन करून पाहुण्यांचे स्वागत केले. कॅम्प बाबत दिल्लीहून आलेल्या डॉक्टरांच्या चमूने समाधान व्यक्त केले. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती स्तरावर सर्वांनी खूप परिश्रम घेतले. आरोग्य विभागाच्या विस्तार अधिकारी खोडे हया उपस्थिती होत्या. यावेळी शिक्षण विभागाचे अधीक्षक संदीप कोवे, संजय वर्मा, अमोल खंडारे यांनी शिबीर यशस्वीरित्या पार पडले.

# शहर व ग्रामीण भागातील गणेश विसर्जन शांततेत

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.20 )-** अचलपूर शहरातील दोन पोलिस स्टेशन अंतर्गत एकुण 95 सार्वजनीक गणेश मंडळांच्या गणेशजी चे विधीवत विसर्जन शांततेत पार पडली.

अचलपूर शहरातील अचलपूर पोलिस स्टेशन अंतर्गत एकुण 42 तर सरमसपूरा पोलिस स्टेशन अंतर्गत ग्रामीण 20 व शहरी 33 असे एकुण 95 सार्वजनिक गणेश उत्सव मंडळे आहेत. गणेश चतुर्थी पासून अकरा दिवस विविध सामाजिक कार्यक्रमांचे व महाप्रसादांचे कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. अनंत चतुर्दशी पासून असंख्य घरगुती व सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणेश मुर्तींचे विधीवत विसर्जन करण्यास सुरुवात झाली. अतिसंवेदनशील शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहरातील गणेशोत्सव शांततेत पार पाडण्याचे दृष्टीने 16 ते 19 सप्टेंबर पर्यंत विविध विसर्जन मिरवणूकीचे नियोजन दोन्ही पोलिस स्टेशनने संयुक्तपणे केले. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी संपूर्ण शहर व ग्रामीण भागात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गांधीपुल परिसरात झालेल्या शुल्लक घटनेला सुध्दा यशस्वीपणे हाताळत शहरातील शांतता व सुव्यवस्था बिघडू न देता स्थानिक पोलीस प्रशासन, महसूल विभाग, नगरपरिषद प्रशासन, सामाजिक संघटना, शांतता समीती, हेल्पलाईन, राजकीय पक्ष व नागरिकांनी शांतता कायम ठेवून गणेश विसर्जनाच्या मिरवणुका पार पाडल्या.

# झेनिथ कन्सेप्ट स्कूलमध्ये हिंदी दिवस

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.20 )-** स्थानिक अमरावती रोडवर असलेल्या मोर्शी येथील झेनिथ कन्सेप्ट स्कूल या नामांकित शाळेत इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी हिंदी दिवसाचे आयोजन केले होते. 14 सप्टेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटनेत हिंदीला राजभाषेचा दर्जा देण्यात आला. म्हणून आपण दरवर्षी 14 सप्टेंबर हा हिंदी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. हिंदी दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी हिंदीच्या अचूक उच्चारासह उत्कृष्ट सादरीकरण केले. हिंदी दिवस कार्यक्रमाची सुरुवात इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी ईश्वरी चौधरी हिच्या भाषणाने झाली. शाळेतील विद्यार्थ्यांनी हिंदी दिवसाचे महत्त्व सांगणारी श्रवणीय आणि मनापर्यंत पोहोचणारी भाषणे, संवाद आणि गाणी सादर केलीत. शाळेच्या संचालिका डॉ.दिपाली देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या सादरीकरणाचे कौतुक करून हिंदी ही आपली राष्ट्रभाषा असल्याचे सांगितले. हिंदी ही अशी सार्वजनिक भाषा आहे की प्रत्येक जातीचे लोक आणि प्रत्येक धर्माचे अनुयायी सहज बोलू शकतात,





यासोबतच शाळेचे सहसचिव डॉ. सावन देशमुख यांनीही हिंदी दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. प्राचार्य दिनेश फंदे यांनी सांगितले की आपण आपल्या मातृभाषेचा आदर केला पाहिजे. हिंदी दिनानिमित्त समन्वयक पूजा झंवर यांनी मोलचे मार्गदर्शन केले. तसेच झेनिथ कॉन्सेप्ट स्कूलच्या हिंदी शिक्षिका दामिनी उकंडे आणि कोमल येवले यांच्या योगदानासह सर्व शिक्षक आणि कर्मचारीही सहभागी झाले होते. इयत्ता सहाच्या भक्ती चौधरी आणि मुक्ताई कोंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विद्यार्थ्यांनी भाषणे, संवाद आणि गीते सादर केली त्यामध्ये दोहन राठी, अक्षद राऊत, रिद्धी गावंडे, सानवी राठी, यशस्वी सिरस्कार, दर्शन गावंडे, मिस्टी काळे, यशस्वी धोटे, मिताली डायलकर, गीत आंगनानी यांनी सहभाग घेतला होता. इयत्ता आठवीचा विद्यार्थी संकल्प आडोळे याने आभार प्रदर्शन केले.

# खासगी वाहनांवर ‘पोलिस’, ‘महाराष्ट्र शासन’ चे स्टिकर्स

## परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष!

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.20 ) -** मोटार वाहन अधिनियम 1988 नुसार सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना खासगी वाहनावर सरकारी नावाची पाटी लावण्यास सक्त मनाई आहे. मात्र, खासगी वाहनांवर पोलिस, वकील, डॉक्टर, खासदार, आमदार, न्यायाधीश, महाराष्ट्र शासन, राज्य सरकार, राज्य शासन, केंद्र सरकार, केंद्र शासन अशी स्टिकर्स असलेली वाहने दररोज अमरावती शहरात तसेच ग्रामीण भागात परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांसमोरून धावतात. या वाहनांवर कारवाई करणे तर सोडाच; पण लावलेले स्टिकर







किंवा पाटी काढून टाकण्याची ताकीद देण्याचीही हिंमत दाखवत नाहीत, हे विशेष.

बहुतांश पोलिस अधिकारी, कर्मचारी, अंमलदार आणि त्यांचे नातेवाईक हे त्यांच्या खासगी वाहनांवर पोलिस नावाची लाल रंगाची पाटी लावून वाहन चालवितात. त्याचबरोबर पोलिस खात्याशी काहीही संबंध नसणारे अनेकजण आपल्या वाहनात समोरच्या बाजूला पोलिस अधिकाऱ्याची कॅप व पोलिस पाटी ठेवून वाहन चालवितात. अशा प्रकारे पोलिस पाटी लावलेली वाहने नाकाबंदी करून; तसेच सुरक्षा तपासणी न होता सोडली जाण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे याचा गैरवापर होऊन नागरिकांच्या जिवाला धोका होऊ शकतो; तसेच पोलिस पाटी लावून अशा प्रकारच्या वाहनांमार्फत काही गैरकृत्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

खासगी वाहनांवर पोलिस किंवा महाराष्ट्र शासन यासह अन्य नावांच्या पाट्या लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची तरतूद मोटार वाहन कायद्यात आहे. मोटार वाहन अधिनियम 1988 च्या कलम 177 चे उल्लंघन ठरते. मात्र, प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आजपर्यंत कारवाई केली नाही. अमरावती जिल्ह्यात शहरात आणि ग्रामीण मोठ्या प्रमाणावर असे लोगो आणि नाव असलेले वाहन जोरात धावत असून यावर कारवाई करण्यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी कधी मोहीम सुरू करतील हे अजून तरी अनुउत्तरिय आहे. यामुळे मात्र खरे कोण आणि खोटे कोण हे समजणे कठीण होत आहे. त्यामुळे यावर धडक कारवाई ची आता अत्यंत गरज निर्माण झाली आहे. प्रादेशिक परिवहन विभाग अधिकारी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका पातळीवर पेट्रोलिंग करत असते मात्र या दरम्यान एकही कारवाई त्यांनी केले नसल्याचे स्पष्ट आहे.

# घरकुल लाभार्थ्यांचे अनुदान त्वरीत द्या, अन्यथा आत्मदहन!

## तंटामुक्त समिती माजी अध्यक्ष सोपान ढोले यांचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.20 ) -** नमो घरकुल योजनेचे तालुक्यातील लाभार्थ्यांचे अडकलेल्या अनुदानामुळे तहसिल कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा जरुड येथील तंटामुक्त समिती माजी अध्यक्ष सोपान ढोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तहसीलदारांमार्फत एका निवेदनाव्दारे दिला आहे.



या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नमो घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे मागिल डिसेंबर महिन्या पासून 15 हजार रुपयांचा प्रथम टप्पा मिळाल्यावर घरकुल बांधण्यासाठी परिसरातील निकटवर्तियांकडून उसनवार घेवून लोहा, सिमेंट उधार घेऊन लाभार्थ्यांनी बांधकाम सुरु केले. मात्र आता ही लाभाची रक्कम अडकली असल्यास जरुड येथील जवळपास 70 लाभार्थी तर तालुक्यातील अंदाज 1400 तर संपण राज्यातील 3 लाख लाभार्थी नमो घरकुल योजनेतील अनुदान मिळणेसाठी चकरा मारत मारत हतबल झाले आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर करण्यापूर्वी नमो घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान तातडीने वितरित करण्यात यावे अन्यथा निवडणुकीच्या तारखा जाहीर होताच कोणत्याही दिवशी मी लाभार्थ्यांना घेऊन तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करणार असून यावेळी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास आपण स्वत: जबाबदार रहाल, असा इशारा दिला आहे.